**कामगार आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.**

**विषय : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक १५.०७.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्तांत .**

दिनांक १५.०७.२०१५ रोजी दु.३.०० वाजता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची २५ वी बैठक कामगार आयुक्त कार्यालय, कामगार भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. ओमप्रकाश यादव | : | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |
| २. | मा. श्री. एच.के. जावळे (भा.प्र.से.) | : | राज्य शासनाचे प्रतिनिधी तथा कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. |
| ३. | श्रीम. मेघा धवल आपटे | : | मालक प्रतिनिधी |
| ४. | श्री. श्रीपाद कुटासकर | : | कामगार प्रतिनिधी |
| ५. | श्री. विजय देवरुखकर | : | कामगार प्रतिनिधी |

बैठकीच्या सुरुवातीस सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष, शासन प्रतिनिधी, मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधींचे स्वागत केले. बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांसंबंधीच्या कागदपत्रांचा संच सर्व मान्यवर सदस्यांना वितरित करण्यात आला.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष महोदयांनी बैठकीचे कोरम पूर्ण झाल्याची खात्री करुन बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांचे स्वागत केले. मा. अध्यक्ष महोदयांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कायद्याखाली असून या मंडळावर मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस, मा. मुख्यमंत्री महोदयांनी माझी अध्यक्ष म्हणून निवड केली, त्याबद्दल मा. मुख्यमंत्री व मा. कामगार मंत्री यांचा मी आभारी आहे असे

प्रतिपादन केले. त्याचप्रमाणे अधिसूचित झाल्याप्रमाणे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या तरतूदींची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याची खंत व्यक्त केली.

मा. अध्यक्षांनी असेही सांगितले की, मंडळाकडे उपकरापोटी आजमितीस जवळपास रु. ३२००/- कोटी रक्कम जमा झाली असून राज्यातील एकूण ३ लाख ६९ हजार बांधकाम कामगारांची मंडळामध्ये नोंदीत लाभार्थी म्हणून नोंद झाली असून या कामगारांना विविध योजनांतर्गत एकूण रु. १८२/- कोटींचा खर्च झाला आहे. त्यामुळे मंडळाने भारत सरकारने अधिसूचित केल्याप्रमाणे या अधिनियमाच्या अंमलबजावणीचा अवलंब करणे गरजेचे असल्याचे सांगितले. याकरिता मंडळाचे सर्व काम हे ई-प्रणालीद्वारे संगणकीकृत करणे, जनजागृती जाहिराती व अन्य माध्यमांद्वारे करावयास हवी, तसेच मुख्य कार्यालय, जिल्हास्तरीय कार्यालयांमध्ये स्वतंत्र कर्मचारी / अधिकारी यांची नियुक्ती करणे तसेच जिल्हा मुख्यालयाला जागेची मागणी करणे, भविष्यात स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध करणे, हे सर्व १ महिन्याच्या आत उलट टपाली कळविणे त्यांनी १ महिन्याच्या आत अहवाल न दिल्यास मंडळ शासनास तसा प्रस्ताव सादर करतील. तसेच इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील योजनांचा लाभ राज्यातील जास्तीत-जास्त बांधकाम कामगारांना मिळण्याकरीता आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त बांधकाम कामगारांची सदर मंडळांतर्गत नोंदणी व्हावयास हवी. कर्नाटक, छत्तीसगड राज्यांमध्ये इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळांतर्गत कामगारांची मोठ्या प्रमाणात नोंदणी झाली असून त्यांना अर्थ सहाय्य योजनांचे लाभ देखील मोठ्या प्रमाणात देण्यात येत आहेत. त्यामुळे अशा राज्यांमध्ये अभ्यास दौरा काढण्यात यावा व त्या ठिकाणी मंडळाचे कामकाजाची पध्दत इ. बाबत अभ्यास करावा, असे मत मा. अध्यक्षांनी मांडले.

यावर मा. कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, केंद्र शासनाचा इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ अंतर्गत जमिनीची किंमत वगळून त्यावर उपकर वसूल करण्याची तरतूद आहे व त्यानुसार उपकर वसूल केला जात आहे. सदर मंडळावर अधिनियमाच्या कलम ४ अन्वये प्रशासकीय बाबींसंबंधी सल्ला देण्यासाठी मा.

कामगार मंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सल्लागार समिती स्थापन झालेली आहे. तर कलम ५ अन्वये अधिनियमांतर्गत नियमावली बनविणेबाबत सल्ला देण्यासाठी मा. कामगार मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. नियमामध्ये काही बदल करावयाचा असेल तर तज्ञ समितीची मान्यता घ्यावी लागते. सदर मंडळाकडे बांधकामासंबंधी काम करणाऱ्या आस्थापनांची नोंदणी होते. त्याकरीता सहायक कामगार आयुक्त यांची नोंदणी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

मंडळाच्या सचिव यांनी सदर बैठकीमध्ये खालीलप्रमाणे विषयनिहाय चर्चा करण्यात येत असल्याचे सांगितले.

**विषय क्र. १) : मागील बैठकीचे इतिवृत्तांत मंजूर करणे.**

दिनांक २४.०६.२०१५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीस सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

**विषय क्र. २) : सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १८ (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारान्वये महाराष्ट्र शासनाने दिनांक १ मे २०११ रोजीच्या अधिसूचनेद्वारे बांधकाम कामगारांसाठी कल्याणकारी योजना राबविण्याकरिता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या त्रिपक्षीय मंडळाची स्थापाना केलेली आहे. दिनांक २८.०५.२०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सदर मंडळाची पुनर्रचना करण्यात आलेली आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण उपकर अधिनियम, १९९६ च्या कलम ३(१) अन्वये बांधकाम खर्चाच्या १% इतकी रक्कम उपकरांतर्गत मंडळाकडे जमा केली जाते. या निधीतून मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक सोबत जोडण्यात येत आहे.

सदर अंदाजपत्राकामध्ये मा. कामगार आयुक्तांनी मा. अध्यक्षांना एखाद्या रकमेमध्ये बदल करावयाचे असल्याचे ते आपल्या परवानगीने आपण करु शकतो असे सांगितले. तसेच

मंडळासाठी इमारत भाड्याने घेणे यासाठी रु. २५ लाख ऐवजी रु. १ कोटींची तरतूद करण्यात यावी त्याचप्रमाणे मंडळाच्या भविष्यातील नवीन योजना इत्यादीसाठी अपेक्षित एकुण खर्च रु. ५० कोटी आहे त्याऐवजी रु. ६० कोटी करण्यात यावे अशा सूचना मा. अध्यक्ष यांनी दिल्या.

**विषय क्र. ३) : टी.डी.एस. ची रक्कम आयकर विभागास अदा करणेबाबत.**

मंडळाचे सचिव यांनी अशी माहिती दिली की, मंडळाचे कार्यालय २००७ पासून स्थापन झाले असून मंडळामार्फत विहित कामे वेगवेगळ्या यंत्रणेमार्फत करुन घेण्यात आली आहेत. सदर कामासाठी देयके संबंधित यंत्रणेसाठी देत असताना २% टीडीएस बिलाच्या रकमेतून कपात करण्यात आली आहे. तथापि, सदर २% रक्कम इनकम टॅक्स विभागास रिटर्नद्वारे भरणा करण्यात आलेली नाही. इनकम टॅक्सच्या नियमांनुसार सदर रक्कम रु. १,४३,३९,८३२/- + व्याजाची रक्कम + दंडाची रक्कम आयकर विभागास भरणे आवश्यक आहे. यावर चर्चा होवून रु. १,४३,३९,८३२/- + व्याजाची रक्कम + दंडाची रक्कम अशी एकूण टीडीएसची रक्कम आयकर विभागास भरणा करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

**विषय क्र. ४) : सनदी लेखापाल व लेखापरीक्षक यांचे नियुक्तीबाबत.**

मंडळाकडे लेखा अधिकारी पद भरलेले नाही त्यामुळे मंडळाचे लेखा विषयक काम करण्यासाठी लेखापाल व सदर कामाचे परीक्षण करण्याकरिता लेखापरीक्षण करण्यासाठी सनदी लेखापाल व लेखा परिक्षक यांची नियुक्ती करण्याची आवश्यकता होती. त्यानुसार दरपत्रक मागवून सनदी लेखापाल व लेखा परिक्षक यांची खालील तपशीलानुसार नियुक्ती करण्यात आलेली आहे. मंडळाकडे जमा होणारी सेसची रक्कम व मंडळाचा आर्थिक व्यवहार पाहता सनदी लेखापाल व लेखापरिक्षक यांची नियुक्ती करणे अत्यावश्यक होते. त्यानुसार या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

सिंघवी, ओतुरकर आणि केळकर कंपनी, सतिश बडवे आणि कंपनी, एस.एस.केंद्रे आणि असोसिएट्स या ३ कंपन्यांचे दरपत्रक मागवून संबंधित कामासाठी नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे.

## तक्ता (३१.०८.२०१५)

| अ.क्र. | कंपनीचे नाव | दिनांक | कामाचे स्वरुप | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सिंघवी, औतुरकर आणि केळकर कंपनी | १६.०३.२०१५ | Auditing | रु. २,९०,०००/- + सेवा कर |
| २. | सतिश बडवे आणि कंपनी | १६.०३.२०१५ | Accounting & Data Entry | रु. २,८०,०००/- + सेवा कर |
| ३. | एस.एस.केंद्रे आणि असोसिएट्स | ३०.०३.२०१५ | T.D.S. & Related work | रु. ६०,०००/- + सेवा कर |

या नियुक्त्यांसाठी कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, असे सचिव यांनी सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा होवून सदरच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**विषय क्र. ५) : गुंतवणूकीबाबतची माहिती.**

प्रलंबित धोरणानुसार उपकरापोटी जी रक्कम मंडकाकडे जमा होते ती रक्कम बँक ऑफ इंडियाच्या मंडळाच्या खात्यात जमा होते. मंडळाकडे जमा होणारी रक्कम सुरक्षित रहावी व त्यातून मंडळास अधिक व्याज मिळावे या दृष्टीकोनातून सदर रकमेची राष्ट्रीयकृत बँकेमध्ये वेळोवेळी गुंतवणूक केली जाते. सध्याच्या प्रलंबित धोरणानुसार राष्ट्रीयकृत बँकांकडून निश्चित केलेल्या दिवशी सिलबंद दरपत्रक मागविले जातात. सर्व बँकर्सच्या समोर असलेले बंद दरपत्रक उघडून गुंतवणूक करावयाच्या रकमेसाठी ज्यांचे व्याज दर जास्त असतील अशा बँकेमध्ये १ वर्षाच्या मुदत ठेवीमध्ये रु. २६६९/- कोटी एवढा निधी गुंतवणूक करण्यात आला असल्याचे सचिव तथा सहायक कामगार आयुक्त यांनी सांगितले.

गुंतवणूकीचा बँकनिहाय तपशिल मंडळाच्या माहितीस्तव सादर करण्यात आले. या गुंतवणूकीची मंडळाने नोंद घेतली.

**विषय क्र. ६) : मंडळाचे सदस्य यांचा भत्ता निश्चित करणेबाबत.**

मा. अध्यक्ष यांनी मंडळाचे सदस्य यांच्या उपस्थिती भत्ता आणि प्रवास खर्चाबाबत काय तरतूद आहे याबाबत विचारणा केली.

सचिव तथा सहायक कामगार आयुक्त यांनी सांगितले की, मंडळाच्या मागील बैठकांमधील ठरावांमध्ये अशासकीय सदस्यांना देय असलेल्या भत्त्यांबाबत सुसुत्रता नव्हती. त्यामुळे या बैठकीतच स्पष्ट ठराव घेऊन मंडळाच्या अशासकीय सदस्यांचे भत्ते ठरविणे योग्य होईल. यावर सखोल चर्चेअंती असे ठरले की, **"मंडळाच्या प्रत्येक अशासकीय सदस्यांस मंडळ बैठकीच्या दिवसासाठी रु. २०००/- बैठक भत्ता, रु.८९००/- व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणा-या शासकीय कर्मचा-यांना लागू असलेल्या बैठकीच्या १ दिवस अगोदर व बैठकीचा दिवस असे एकूण २ दिवसांसाठी दैनिक भत्ता, द्वितीय वर्ग वातानुकुलित २-स्तर रेल्वेचे अथवा वातानुकुलित बसचे प्रत्यक्ष भाडे व टॅक्सीभाडे रु.५००/- अनुज्ञेय करावेत."** त्यानुसार वरीलप्रमाणे मंडळाच्या अशासकीय सदस्यांच्या भत्त्यांबाबत सर्वानुमते ठराव घेण्यात आला.

**विषय क्र. ७) : मंडळाच्या अध्यक्षांनी सुचविलेले विषय.**

अ)**मंडळाद्वारे राबविण्यात येत असलेल्या जनता आरोग्य व वैद्यकीय व अपघात विमा योजनेबाबत.**

सदर योजने अंतर्गत बांधकाम कामगारांना २ लाख रुपयांपर्यंत न्यु इंडिया अश्योरन्स प्रा.लि., यांचेकडून मेडिक्लेम पॉलिसी काढण्यात आली आहे. सदर योजनेचा कालावधी दिनांक २०.०८.२०१५ रोजी संपुष्टात येत आहे. सदर योजना पुढील वर्षीही लागू करणेसाठी ई-निविदाद्वारे व इन्श्युरन्स कंपनीची निवड करण्यात यावी, असे मा. अध्यक्षांनी सुचविले. त्यास सर्वांनी मान्यता दिली.

सदर काम सध्याचा कालावधी संपुष्टात येण्याच्या आधी सुरु करावे, अशा सूचना मा. अध्यक्षांनी सचिवांना केल्या.

ब) **मंडळाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत असणे.**

मा. अध्यक्ष यांनी असे प्रतिपादन केल की, मंडळाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत असणे आवश्यक आहे. यावर कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या कार्यालयासाठी स्वतंत्र जागा आवश्यक आहे. यासाठी कामगार भवन इमारतीवर २ मजले वाढवून कार्यालयासाठी जागा निर्माण करता येईल क, याबाबत MMRDA कडे विचारणा करण्यात आली आहे. MMRDA कडून FSI वाढवून मिळाल्यानंतर सध्याच्या इमारतीवर २ मजले बांधकाम करता येईल व त्यामध्ये मंडळाच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध होवू शकेल असे सांगितले. तथापि, सदर कामासाठी वेळ लागणार असल्यामुळे कामगार भवन इमारतीच्या बाजूस महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनमध्ये चौथ्या मजल्यावर जागा भाड्याने उपलब्ध होवू शकेल. याबाबत मा. अध्यक्ष यांनी सदर जागा भाड्याने घेण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक ती कार्यवाही करावी असे सांगितले. याबाबत सविस्तर चर्चा होवून महाराष्ट्र हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनकडे याबाबत पत्र व्यवहार करुन शासनास प्रस्ताव पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

क)**मंडळासाठी टोल फ्री सेवा सुरु करण्याबाबत प्रस्ताव कामगार आयुक्तालयात सादर करण्यास सांगितले.**

कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, संपूर्ण कामगार विभागाचे संगणकीकरण करण्यासाठी शासनाने एक्सेंजर या कन्सल्टंटची नियुक्ती केली आहे आणि त्यानुसार BPR तयार होवून RPF डॉक्युमेंट तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे. या प्रकल्पामध्ये हेल्पडेस्कची तरतूद आहे. त्यामुळे टोल फ्री सुविधा हे विभागाचे संगणकीकरणा समवेतच विचाराधीन असल्यामुळे वेगळी सुविधा करण्याची आवश्यकता नाही.

ड) **नोंदीत कामगारांच्या पाल्यास लॅपटॉप वाटप न करण्याचा प्रस्ताव.**

सन २०१४ मध्ये बांधकाम कामगारांच्या पाल्यास लॅपटॉप वाटप करण्याचे विचाराधीन होते, त्यासाठी ५० लॅपटॉप्सची लाक्षणिक स्वरुपाची खरेदी शासनस्तरावरुन करण्यात आली

होती. परंतू कामगारांच्या मुलांस लॅपटॉप वाटप केल्यास सरकार उच्च शिक्षित मुलांना लॅपटॉपची गरज असताना त्यांना न देता ते बांधकाम कामगारांच्या मुलांना जेथे गरज नाही तेथे देते असा विचार करुन जनमत शासनाच्या विरोधात जावू शकते अशी तत्कालीन कामगार मंत्री व प्रधान सचिव यांची तत्कालीन मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांशी अनोपचारिक चर्चा झाल्याचे समजते. त्यामुळे बांधकाम कामगारांच्या मुलांसाठी लॅपटॉप वाटप करणबाबत शासन स्तरावरुन कोणत्याही सूचना प्राप्त न झाल्याने सदर ५० लॅपटॉप पडून होते म्हणून मंडळाच्या बैठकीत ठराव घेवून जिल्हा कार्यालयांना मंडळाचे कामकाज करण्यासाठी सदर लॅपटॉप देण्यात आले आहेत, असे मा. कामगार आयुक्तांनी सर्वांना सांगितले.

**इ) नोंदणीकृत पाल्यास शैक्षणिक उपयोगाची पुस्तके वाटप करण्याबाबत.**

बांधकाम कामगारांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य दिले जावे, ही बाब मंडळाच्या विचाराधीन होती. याकरीता नवनीतकडील काही बौदधीक पुस्तकांचा संच ज्यामध्ये जनरल नॉलेज, इसाप नीती, Oxford Dictionary चा समावेश आहे, असा पुस्तक संच प्रतिसंच रु. १०००/- प्रमाणे १ लाख संच खरेदी करण्याचा ठराव मंडळ बैठकीत सर्वानुमते घेण्यात आला व त्यास शासनाने मान्यता दिली. त्याप्रमाणे सदर पुस्तकसंचांचे सर्व जिल्हास्तरावर वाटप करण्यात आले. सदरचे वाटप हे जिल्हास्तरावरील बांधकाम कामगारांच्या मुलांना करण्यात आले, परंतू सदर योजनेंतर्गत जिल्हास्तरावरील मुले त्यांचा उपयोग करुन घेत नाहीत. तसेच सदर पुस्तकसंच घेवून जाण्यासाठी बांधकाम कामगार जास्त उत्सुक दिसून येत नाहीत.

यावर श्री. कुटासकर, कामगार प्रतिनिधी यांनी सांगितले की, कामगारांची मुले यांचा उपयोग करुन घेत नसल्याने सदरचे पुस्तकांचे संच जसेच्या तसे धूळ खात पडतात व ते वाया जावू नयेत याकरीता आपण सदरचे संच हे जिल्हापरिषद शाळेतील मुलांना वाटप करण्यात यावे. यावर सचिव तथा सहायक कामगार आयुक्त यांनी सांगितले की, मंडळांतर्गत केवळ बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांनाच कल्याणकारी योजनांचा लाभ देण्याची तरतूद आहे त्यामुळे या पुस्तकांचा संच इतर मुलांना देता येणार नाही.

यावर कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, सदरचा योजनेचा लाभ बांधकाम कामगारांच्या मुलांना होण्याकरीता आपण कॅम्प आयोजित करुन जनजागृतीद्वारे

पुस्तकांचे महत्व बांधकाम कामगारांना तसेच त्यांच्या पाल्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करु. त्याचप्रमाणे नोंदीत नाका कामगारांना देखील या योजनेचा लाभ कसा होईल यासाठी प्रयत्न करु.

नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या वाढावयास हवी. त्यामुळे प्रत्येक बांधकाम कामगार ज्याने ९० दिवस बांधकाम काम केले आहे त्या कामगारांची नोंदणी होणे गरजेचे आहे. बऱ्याचदा कामगार ९० दिवसांपेक्षा अधिक दिवस काम करीत असतात परंतू त्यांचे नाव कामाच्या ठिकाणी नोंदवून घेतले जात नाही, याकरीता बांधकामाच्या ठिकाणी ठेकेदारांना त्यांनी नियुक्त केलेल्या बांधकाम कामगाराची नोंद ठेवणे व पात्र बांधकाम कामगारांची मंडळाकडे नोंदणी करणे सक्तीचे करण्यात यावे असे श्री. कुटासकर, कामगार प्रतिनिधी यांनी सांगितले. उपस्थित सर्व सदस्यांनी यास सहमती दर्शविली.

मा. अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, आपण दिल्ली मॉडेल अंमलात आणले पाहिजे. दिल्ली, झारखंड तसेच गुजरात या ठिकाणी बांधकाम कामगारांची नोंदणी अधिक प्रमाणात आहे, ती कशाप्रकारे होते याचा अभ्यास केला पाहिजे. झारखंड राज्यात एकूण १६.५० लाख कामगारांची मंडळामध्ये नोंदणी करण्यात आली आहे, असेही मा. अध्यक्ष म्हणाले. मा. कामगार आयुक्त यांनी मध्य प्रदेशमध्ये एकूण ३६ लाख कामगारांची मंडळामध्ये नोंदणी झालेली आहे. त्याकरीता सदर राज्याने संघटनांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याकरीता प्राधिकृत केले होते असेही त्यांनी सांगितले. याचप्रकारचा प्रस्ताव आपल्या मंडळामध्येही यापूर्वी मांडण्यात आला होता व सदर प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आला होता. तथापि, विधी व न्याय विभागाने सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कळविले की, अशाच प्रकारचा प्रस्ताव मा. गुजरात उच्च न्यायालयात देखील दाखल करण्यात आला होता. तथापि, त्यावर मा. गुजरात उच्च न्यायालयाने असे आदेश दिलेत की, कामगार संघटनांना बांधकाम कामगारांना ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार नाहीत व ते त्यांना देण्यात येऊ नयेत. म्हणून मंडळाच्या बैठकीत ठराव घेवून स्थानिक पातळीवर ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका, इ. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना असे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये बांधकाम

कामगारांची नोंदणी कशाप्रकारे वाढविता येईल यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. असेही ते म्हणाले.

इ) **कर्मचाऱ्यास १० % भत्ता देण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.**

सध्या मंडळाकडे स्वतंत्र कर्मचारीवृंद नसल्याने कामगार आयुक्त कार्यालयातील जे कर्मचारी मंडळासाठी काम करतात त्यांना १०% भत्ता मंडळाच्या प्रशासकीय खर्चा अंतर्गत देण्याबाबत ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला होता असे सचिव तथा सहायक कामगार आयुक्त यांनी सर्व उपस्थितांना निदर्शनास आणून दिले. मंडळाच्या पूर्वी झालेल्या बैठकीत १०% भत्ता देण्याबाबतचा ठराव शासनाकडे पाठवून त्यावर कार्यवाही करता येईल असेही त्यांनी सांगितले.

उ) **मंडळाच्या कल्याणकारी योजनांबाबत माहिती पुस्तिका तयार करणेबाबत.**

दिनांक ०९.०६.२०१४ रोजी झालेल्या तज्ञ समितीच्या बैठकीमध्ये मंडळाच्या कल्याणकारी योजनांबाबत माहिती पुस्तिका तयार करुन महाराष्ट्रातील सर्व नगरसेवक, आमदार, खासदार व इतर लोकप्रतिनिधी यांना आणि विविध शासकीय कार्यालयांस वाटप करण्याबाबत सर्वानुमते ठरले व त्यानुसार मंडळाच्या पूर्वी झालेल्या बैठकीत मंडळाच्या योजनांच्या माहिती पुस्तिकेच्या १ लाख प्रति छापून घेण्यात आल्या आहेत व सर्व जिल्हा कार्यालयांस वाटप करण्यात आल्या असल्याचे सचिव तथा सहायक कामगार आयुक्त यांनी सांगितले.

ऊ)**शासकीय अधिकाऱ्यांना सेस कलेक्टर, असेसिंग ऑफिसर व ॲपिलेट ऑफिसर्सचे काम करण्याबाबत.**

मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, शासनाच्या दिनांक १६.०४.२००८ च्या अधिसूचनेनुसार विविध विभागातील अधिकाऱ्यांस सेस कलेक्टर, असेसिंग ऑफिसर्स आणि ॲपिलेट ऑफिसर्स म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या सर्व सेस कलेक्टर्स व असेसिंग ऑफिसर्स यांनी नियमाप्रमाणे सेसची आकारणी करुन, सेस गोळा करणे अपेक्षित आहे. याबाबत या सर्व अधिकाऱ्यांना पत्र पाठवून पुनश्च: सूचना देण्यात याव्यात, अशी चर्चा मंडळाच्या बैठकीत झाली असल्याचे सचिव तथा सहायक

कामगार आयुक्त यांनी सांगितले. त्याप्रमाणे सर्व संबंधितांना पत्राद्वारे कळविण्यात आले असल्याचेही त्यांनी सर्व उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले.

**विषय क्र. ८) : मा. अध्यक्षांनी आयत्यावेळस मांडलेले विषय :**

१. दिल्ली, गुजरात, झारखंड तसच मध्यप्रदेश या राज्यांप्रमाणे महाराष्ट्र राज्यामध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी कशाप्रकारे वाढविण्यात येईल ते पहावे.

२. सदर मंडळामध्ये अध्यक्षांचे कोणते अधिकार आहे याची माहिती घ्यावी.

३. नियम ४६ अन्वये ठराव मान्यतेसाठी शासनाकडे पाठविणे बंधनकारक आहे. तथापि, दैनंदिन खर्चाची शासनाकडून मान्यता घेणे गरजेचे नाही.

४. अध्यक्षांचे सचिव या पदाकरीता अर्ज मागवले पाहिजेत.

५. सरकारी कामगार अधिकारी यांचेकडून बांधकामाच्या ठिकाणी सर्वेक्षण करण्यात यावे. तसेच बांधकाम कामगारांची नोंदणी करणेबाबत चौकशी करावी.

६. मोठे बिल्डर्स हे नोंदणीकृत ठेकेदार असतात. परंतू फार मोठ्या प्रमाणात प्रायव्हेट बिल्डर्स यांचेकडे नोंदणी प्रमाणपत्र नसते त्यामुळे तेथे काम करणाऱ्या कामगारांची सुध्दा नोंदणी बांधकाम कामगार म्हणून करण्यात येत नाही.

७. श्री. कुटासकर, कामगार प्रतिनिधी यांनी औरंगाबाद येथील नोंदणी फॉर्म चुकीचा आहे हे निदर्शनास आणून दिले. मा. अध्यक्षांनी औरंगाबाद विभागास योग्य नोंदणी फॉर्म देण्यात यावेत असे सांगितले.

८. कार्यालयीन कामकाजासाठी लागणारे साहित्य जसे संगणक, प्रिंटर, झेरॉक्स मशिन, फॅक्स मशिन, स्कॅनर, फर्निचर, इत्यादीसाठी रु. ५ लाखांची तरतूद करण्यात यावी असे सांगितले.

९. मंडळा अंतर्गत ५६ पदे भरताना सदरची पदे ही कायमस्वरुपी तत्त्वावर भरावीत.

१०. भरती प्रक्रिया करताना लिपिक टंकलेखक, वाहन चालक, शिपाई, इ. पदे त्वरीत भरण्यात यावीत.

११. धनादेशावर अध्यक्ष / सचिव स्वाक्षरी करण्यासाठी प्राधिकृत करणेकरीता शासनाकडे पत्र पाठवून त्याबाबत मान्यता घेण्यात यावी.

१२. बांधकाम कामगारांची नोंदणी करताना कामाच्या ठिकाणी त्या कामगारांकडून Self Affidavit करुन नोंदणी करण्याचा विचार व्हावा. सदर कामगाराने चुकीची माहिती दिल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

बांधकाम करणाऱ्या कंत्राटदारांनी किंवा मालकांनी नोंदीत कामगारासच कामावर ठेवावे. कोणतेही काम नोंदणी झालेल्या कामगारा ऐवजी दुसऱ्या कामगारांकडून काम करुन घेतल्यास त्या कामगारांच्या नोंदणीची जबाबदारी त्या कंत्राटदारावर राहिल.

यावेळी कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, शासकीय कंत्राटदार जसे की, PWD, Irrigation, MHADA, MMRDA, इ. विभागास सांगून याबाबत विचार करण्यात येईल. त्यामुळे Self Affidavit चा मुद्दा पुढील बैठकीत घेण्यात यावा.

१३. प्रलंबित सर्व नस्तींच्या कामाचा आढावा पुढील बैठकीत घेण्यात यावे.

१४. जास्तीत जास्त बांधकाम कामगारांना दारुचे व्यसन असते व त्यामुळे कामगार मृत्यु पावतात तसेच त्यांच्या मुलांना देखील या व्यसनाची सवय लागते त्यामुळे त्यांच्याकरीता व्यसन मुक्ती केंद्र मंडळ असावे, असा प्रस्ताव मा. अध्यक्षांनी मांडला. यावर कामगार आयुक्त यांनी आपल्याला कोणतेही केंद्र स्थापन करण्याचे अधिकार नाहीत, त्यामुळे मा. अध्यक्षांचा प्रस्ताव फार चांगला असून कामगार कुठल्याही व्यसन मुक्ती केंद्रात उपचार घेत असल्यास सदर कामगाराचा तेथील खर्च मंडळामार्फत देण्यात येईल अशा प्रकारचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येईल, असे सांगितले.

मंडळाची पुढील बैठक दिनांक १२.०८.२०१५ रोजी Tentative आयोजित करण्यात यावी असे मा. अध्यक्षांनी सांगितले. त्यात वेळेवर काही Urgency आल्यास पुढे ढकलता येईल, असे मा. कामगार आयुक्त यांनी सांगितले.

उपस्थित सर्वांचे आभार मानून सहायक कामगार आयुक्त तथा सचिव यांनी बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर
बांधकाम कामगार कल्याणकारी